# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. ३५-२२** **दिनांक ०३/०२/२०२२**

## पोलीस असल्याची बतावणी करुन फसवणूक करणाऱ्या आरोपीतास अटक करुन मुद्देमाल हस्तगत

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील नवघर पोलीस ठाणे हद्दीत दि. ३१.१२.२०२१ रोजी सायंकाळी १९.४० वा. चे सुमारास तक्रारदार श्री. कमल मंडल, हे त्यांचा मित्र श्री. राजकुमार मनिक असे दोघे धरम काटा, फाटक रोड येथुन नवघर रोडकडे नाश्ता करण्यासाठी पायी चालत जात असतांना सॅक्रेड हर्ट कॅथलिक चर्च समोर, फाटक रोड, भाईंदर पुर्व येथे काळया रंगाचे मोटार सायकलवरील एका अनोळखी इसमाने फिर्यादी व त्यांचा मित्र यांना "तुम किधर जा रहे हो, किधर से आ रहे हो, तुम बंगाली हो क्या, तुमे मालुम नहीं क्या, पुलिस बंगाली लोगो को पकड रही है, मै पुलिस हु, तुम चौकी मे चलो, तुम गांजा पिते हो और झुट बोलते हो क्या" असे बोलुन फिर्यादी व त्यांचा मित्राकडुन ओपो व विवो कंपनीचा असे दोन मोबाईल फोन व रोख ७,०००/- रु. रक्कम घेवुन फसवणुक करुन पळुन गेला होता.

वरील गुन्हयाच्या कार्यपध्दतीवर वेळीच आळा घालुन गुन्हयाची लवकात लवकर उकल करण्यासाठी नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटी करण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाच्या घटनास्थळावरील व घटनास्थळाच्या आजुबाजुच्या परिसरातील सी.सी.टिव्ही कॅमेरांचे पडताळणी करुन सदरचा गुन्हा करणार-या अनोळखी आरोपीने परिधान केलेले कपडे व गुन्हयात वापरलेली मोटार सायकलची माहिती प्राप्त केली. गुन्हयाचे तपासात प्राप्त झालेल्या माहितीचे अनुषंगाने आरोपी अल्ताफ हाशमी, वय २९ वर्षे, यास दि. २८.०१.२०२२ रोजी ताब्यात घेवुन त्याने सदरचा गुन्हा केला असल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान आरोपीने नवघर पोलीस ठाणे १) गुन्हा रजि. नं. I ४८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४२० प्रमाणे, २) गुन्हा रजि. नं. ४९/२०२२ भा.दं.वि. सं.कलम ४२०,१७० प्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. गुन्हयाचे तपासादरम्यान आरोपीताकडुन त्याने फसवणुक करुन मिळविलेल्या वर नमुद गुन्हयांमधील रक्कमेपैकी ११,१४०/- रु रोख रक्कम, गुन्हयांत वापरलेली २०,०००/- रु. किं. ची एवेंजर मोटार सायकल क्र. एमएच-०४-जीके-२४७३ व ८,०००/- रु. किं. चे वेगवेगळया कंपनींचे ४ मोबाईल फोन अशी एकुण ३९,१४०/- रु. ची मालमत्ता हस्तगत करुन गुन्हयांची उकल करण्यात आलेली आहे.

सदर आरोपीने अशाच प्रकारे इतर लोकांची देखील फसवणुक केलेली असुन त्याबाबत पोलीस ठाण्याशी संपर्क साधुन तक्रार नोंदविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ.शशीकांत भोसले,सहा.पो.आयुक्त,नवघर विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,नवघर पोलीस ठाणे, पोनि/प्रकाश मासाळ (गुन्हे) ,सपोनि/योगेश काळे,पोउनि/संदिप ओहोळ,पोउनि /संतोष धावडे,पोना/भुषण पाटील,पोशि/गणेश जावळे,पोशि/संदिप जाधव,पोशि/सुरज घुनावत,पोशि /विनोद जाधव यांनी केलेली आहे.

---ooo---